**ठळक बातम्या**

- आपली स्वप्नं साकारण्यासाठी आणि मुलांच्या सुरक्षित भविष्यासाठी शांततेच्या मार्गावर चालावं असं प्रधानमंत्र्यांचं मणिपूरमधे आवाहन

- अनुकंपा तत्त्वावरच्या १५ वर्षांपासून रखडलेल्या नेमणुका लौकरच करणार असल्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा

- नवी मुंबई विमानतळाचं उद्घाटन येत्या ३० सप्टेंबरला

- नैऋत्य मान्सूनचा परतीचा प्रवास यंदा पंधरा ते वीस दिवस आधीच सुरू होईल असा हवामान विभागाचा अंदाज

- आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत पाकिस्तानबरोबरच्या सामन्याचा निषेध करण्याचा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा निर्णय

**आणि**

- हाँगकाँग खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या दुहेरी गटात सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी ही जोडी अंतिम फेरीत दाखल

**<><><><>**

आपली स्वप्नं साकारण्यासाठी आणि मुलांच्या सुरक्षित भविष्यासाठी शांततेच्या मार्गावर चालावं असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मणिपूरमधल्या सर्व गटांना केलं. ते मणिपूरमध्ये एका सभेत बोलत होते. भारत सरकार मणिपूरच्या नागरिकांच्या पूर्ण पाठीशी असल्याचा पुनरुच्चार मोदी यांनी केला.

तत्पूर्वी चुराचंदपूर इथं त्यांनी सात हजार तीनशे कोटी रुपयांच्या १९ विकासकामांचं भूमिपूजन केलं.

सध्या प्रधानमंत्री ५ राज्यांच्या दौऱ्यावर असून मिझोरमच्या विकासात योगदान देणाऱ्या, नऊ हजार कोटींहून अधिक खर्चाच्या महत्त्वाकांक्षी योजनांचा प्रारंभ दूरस्थ पद्धतीने आज सकाळी केला. या योजनांद्वारे मिझोरमच्या रेल्वे, रस्ते, ऊर्जा आणि क्रीडा

क्षेत्राला मोठा लाभ मिळणार आहे. ईशान्येकडची राज्य देशाच्या विकासाचं इंजिन बनत असल्याचा विश्वास प्रधानमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

<><><><>

अनुकंपा तत्त्वावरच्या १५ वर्षांपासून रखडलेल्या नेमणुका लौकरच करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केली.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत यवतमाळ इथं आज आदी कर्मयोगी अभियान आणि जिल्ह्यातील २८९ कोटींच्या प्रकल्पाचं लोकार्पण तसंच लाभ वितरण सोहळा पार पडला. यावेळी ते बोलत होते, यावेळी राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसंच मंत्री संजय राठोड उपस्थित होते.

अनुकंपा तत्वावरील एकही अर्ज शिल्लक राहणार नाही अशी व्यवस्था तयार केल्याचं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं. डिसेंबर २०२६ पर्यंत यवतमाळ जिल्ह्यातल्या शंभर टक्के शेतकऱ्यांना दिवसा १२ तास वीज मिळेल असा विश्वासही त्यांनी यावेळी दिला. यवतमाळ जिल्ह्यात अतिवृष्टीमुळं नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत करु असं आश्वासनही त्यांनी यावेळी दिलं.

<><><><>

नवी मुंबई विमानतळाचं उद्घघाटन येत्या तीस सप्टेंबरला होणार आहे. सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक-उपाध्यक्ष विजय सिंघल यांनी काल ही माहिती दिली. देशातला हा सर्वात मोठा विमानतळ लंडनच्या हीथ्रो विमानतळाच्या बरोबरीचा असेल.  येत्या नोव्हेंबर महिन्यात प्रत्यक्षात कार्यान्वित होणार आहे. हा विमानतळ जलमार्गालाही जोडण्यात येणार असून गेटवे ऑफ इंडिया किंवा इतर ठिकाणाहून जलमार्गाने त्यावर पोहोचणं शक्य होईल.

<><><><>

भारताची पहिली फ्लॅश चार्ज इलेक्ट्रिक बस लवकरच नागपूरहून सुरू होणार असल्याची घोषणा केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी नागपुरात केली. १३५ आसनक्षमतेची ही वातानुकूलित बस लवकरच नागपुरात प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात येणार आहे. सुरुवातीला ही सेवा रिंग रोड मार्गावर असेल आणि नंतर शहराच्या इतर मार्गांवर तिचा विस्तार होईल असं गडकरी यांनी सांगितलं. नागपूर-अमरावती राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वरील २ पूर्णांक ८५ शतांश किलोमीटर लांबीच्या, चार मार्गिका

असलेल्या ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार उड्डाणपुलाचे उद्घाटन गडकरी यांच्या हस्ते झालं. या पुलासाठी १९१ कोटी रुपयांचा खर्च आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कार्यक्रमात आगामी पायाभूत सुविधांविषयी माहिती दिली तसेच काटोल इथं राज्यातलं सर्वात मोठं संत्र प्रक्रिया फूड पार्क उभारण्याची घोषणा केली. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री अॅड. आशिष जयस्वाल हेही यावेळी उपस्थित होते.

**<><><><>**

वस्तू आणि सेवा कर परिषदेनं नुकतंच अनेक क्षेत्रातल्या वस्तू आणि सेवा करात कपात करुन सर्वसामान्यांना दिलासा दिला. जीएसटी कपात झाल्यामुळे अनेक व्यवसायाच्या वाढीसाठीही मदत होणार आहे.

जीएसटी कपातीमुळे पर्यटन क्षेत्रावर होणाऱ्या परिणामाबाबत जाणून घेऊया…

- **- - होल्ड - व्हाईट कास्ट - -**

*(नव्या सुधारणेनुसार हॉटेलमधल्या निवासावरच्या जीएसटीमधे कपात झाली आहे. यामुळे पर्यटकांना परवडणाऱ्या दरात हॉटेल उपलब्ध होतील, आणि पर्यटनाला चालना मिळेल. तसंच हॉटेल, होम स्टे आणि अतिथीगृहामधल्या गुंतवणूकीतही वाढ होईल.*

*त्याचप्रमाणे बस आणि मिनीबसच्या जीएसटी दरातही कपात झाल्यामुळे तिकीट दर कमी होतील. यामुळे पर्यटकांना प्रवास करण्यासाठी तसंच टूर  एँड ट्रॅव्हल्स कंपन्यांना प्रोत्साहन मिळून पर्यटन क्षेत्राला लाभ होईल.)*

**<><><><>**

नैऋत्य मान्सूनचा परतीचा प्रवास यंदा पंधरा ते वीस दिवस आधीच सुरू होईल असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. महाराष्ट्रात परतीच्या पावसाला सुरुवात झाली आहे.  बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे आणि अरबी समुद्र–दक्षिण मध्य महाराष्ट्रातील द्रोणीय स्थितीमुळे राज्यभर पावसाचा जोर वाढला आहे. लातूर, नांदेड, सिंधुदुर्ग आणि सोलापूर जिल्ह्यांसाठी हवामान विभागानं ऑरेंज अलर्ट दिला आहे, तर पुणे घाटमाथा, रायगड आणि रत्नागिरी इथं सोमवारी मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. अनेक जिल्ह्यांत यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

१५ सप्टेंबरला राजस्थानमधून, १७ सप्टेंबरला वायव्य भारतातून तर १५ ऑक्टोबरला संपूर्ण देशातून मान्सून परत जाईल. दरम्यान, मान्सून परतल्यानंतरही अवकाळी पाऊस सुरू राहील, सप्टेंबरच्या अखेरीस वातावरणातील उष्मा वाढून ‘ऑक्टोबर हीट’ जाणवण्याची शक्यता असून, ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये अवकाळी पावसाचं प्रमाण वाढू शकतं, असा हवामान तज्ज्ञांचा अंदाज आहे.

यंदा मान्सून २४ मे ला केरळमधे दाखल झाला आणि २९ जूनपर्यंत देशभरात पसरला. आतापर्यंत देशात ८३६ पूर्णांक २ दशांश मिलीमीटर पाऊस झाला असून तो सरासरीच्या तुलनेत ७ टक्के जास्त आहे.

**<><><><>**

परभणी जिल्ह्यात अतिवृष्टी झाल्यानं पूर्ण परिसर जलमय झाला आहे. पूर्णा तालुक्यात ढोणे पांगरा इथल्या शाळेत पावसाचं पाणी शिरलं. नागरिक आणि शिक्षकांच्या सतर्कतेनं विद्यार्थ्यांना सुखरूप बाहेर काढण्यात आलं. पूर्णा शिवारात समृद्धी महामार्गाचं काम चालू असून यंत्रावर काम करताना थूना नदीच्या पुराच्या पाण्यामध्ये चौघेजण अडकले होते. जिल्हा प्रशासनाच्या पथकानं पुरात अडकलेल्या या कामगारांना सुखरूप वाचवलं.

चंद्रपूर जिल्ह्यात वरोरा तालुक्यातल्या भटाळा, खेमजई, वडगाव, नांद्रा, लोदीखेडा, येरखेडा आदी गावांतील शाळकरी विद्यार्थ्यांची बस काल रात्री परतीच्या मार्गावर असताना नाल्याला आलेल्या पूरामुळे अडकली होती. स्थानिकांच्या आणि प्रशासनाच्या तत्परतेने विद्यार्थ्यांना सुरक्षित घरी पोहचविण्यात आलं.

**<><><><>**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धे उद्या भारत आणि पाकिस्तानच्या संघात होणार असलेल्या सामन्याविरोधात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षनं राज्यव्यापी निषेध आंदोलन करण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज मुंबईत बातमीदारांशी बोलताना दिली. माझं कुंकू, माझा देश या आंदोलनाअंतर्गत पक्षाच्या महिला आघाडीच्या वतीनं प्रत्येक गावातून एका डब्यात कुंकवाच्या डब्या एकत्र करून त्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना पाठवणार आहोत असं त्यांनी सांगितलं.

पहलगाम हल्याचे घाव अजूनही ताजे आहेत, त्यानंतर राबवलेलं ऑपरेशन सिंदूर अजूनही सुरु असल्याचं केंद्र सरकार म्हणत आहे, तरी देखील पाकिस्तानसोबत क्रिकेटचा

सामना खेळला जातोय याबद्दल संरक्षणमंत्री राजनाथ सिंह आणि गृहमंत्री अमित शाह यांनी खुलासा करावा अशी मागणीही त्यांनी केली.

**<><><><>**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज ब गटात, अबुधाबी इथं श्रीलंका आणि बांग्लादेश यांच्यात सामना होणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार रात्री आठ वाजता हा सामना सुरू होईल.

दरम्यान, काल अ गटात पाकिस्तान आणि ओमान यांच्यात झालेला सामना पाकिस्ताननं ९३ धावांनी जिंकला.

**<><><><>**

हाँगकाँग खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी जोडीनं अंतिम फेरी गाठली आहे.  आज सकाळी उपान्त्य फेरीत या जोडीनं चीन ताइपेच्या चेन चेंग कुआन आणि लिन बिंग वेई जोडीचा २१-१७, २१-१५ असा सरळ सेटमध्ये पराभव केला.

अंतिम लढतीत सात्विक आणि चिराग यांचा सामना लिआँग वेई केंग आणि वांग चेंग जोडीशी होणार आहे.

पुरुष एकेरीच्या उपान्त्य फेरीत आज संध्याकाळी लक्ष्य सेनची लढत चीन ताइपेच्या चोऊ तिएन चेनशी होणार आहे. लक्ष्यने काल उपान्त्यपूर्व सामन्यात भारताच्याच आयुष शेट्टीला पराभूत केले होते.

**<><><><>**

केंद्र शासनाच्या निर्देशांनुसार राज्यात १५ ते ३० सप्टेंबर दरम्यान गोवर-रुबेला लसीकरणाची विशेष मोहीम राबवली जाणार आहे.  पालघर जिल्ह्यातल्या सर्व आश्रमशाळांमधल्या ५ ते १५ वर्षे वयोगटातल्या बालकांना या लशीचा एक अतिरीक्त डोस दिला जाणार असून त्यासाठी स्वतंत्र सत्र आयोजित केलं जाणार आहे.

**//<><><><>//**